# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/२०१९/ 1398 दि. 19/06/19

**अत्यंत महत्वाचे/तात्काळ**

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः दि.२१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करणेबाबत...**

शासन निर्णय क्र.संकीर्ण-३०१६/प्रक्र९६/क्रियुसे ९, दि.०८ जून, २०१६ अनुसार राज्यामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्याबाबत मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.०६.२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील सूचनेनुसार, पुढे नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत कार्यक्रमांत सहभागी होणे अनिवार्य आहे.

तालुका स्तरावर सामुहिक योग कार्यक्रमाचे आयोजन माध्यमिक शिक्षण अधिकारी व क्रिडा अधिकारी यांच्या अधिपत्त्याखाली आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रति महाविद्यालय २०० स्वयंसेवक सहभागी होणे अपेक्षित आहे. आपले एनएसएस युनिटमधील किती रासेयो स्वयंसेवक सहभागी होतील याचा अचूक आकडा माध्यमिक शिक्षण अधिकारी यांना कळवावा. उर्वरित स्वयंसेवकांनी विद्यापीठामध्ये व महाविद्यालयामध्ये आयुष विभागाने दिलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार योगाचे प्रकार करणे अपेक्षित आहे. वरील सूचनांचे तंतोतंत पालन व्हावे.

RSDhemmarkar

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रतः
मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.